## निशाणी क्र. ८१ वरील आदेश

वादी क्रमांक १ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आज्ञावली ३९ नियम ११ प्रमाणे प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांचा बचाव रद्द होण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्ज व नि.क्र. ८७ ला असलेले म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

२. प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांनी वादी हिस मासिक रुपये ५,०००/– पोटगी देण्याबाबत दिनांक २४/०९/२०१९ रोजी नि.क्र. ९ ला आदेश पारित केला आहे. तथापि त्यानुसार प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांनी वादी हिला सदर पोटगी रक्कम दिलेली नाही. परिणामी, त्यांनी न्यायालयाच्या या आदेशाचे पालन केले नाही असे वादींचे म्हणणे आहे. प्रतिवादी क्रमांक ३ यांनी सदर आदेशा विरुद्ध मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या समोर दिनांक ०२/०८/२०२२ रोजी डब्ल्यू.पी.एस.टी/१८९७७/२०२२ ही याचिका दाखल केली आहे असे दिसून येते. यावरुन प्रतिवादी यांनी या आदेशास मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या समोर आव्हानित केले आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी हे इच्छा पूर्वक, जाणीव पूर्वक या आदेशाचे उल्लंघन, अवज्ञा करत आहेत असे वाटत नाही. ज्याअर्थी प्रतिवादी यांनी सदर आदेशास मा. मुंबई उच्च न्यायालय येथे आव्हान दिले आहे, त्याअर्थी सदर आदेश आज पावेतो अंतिम झालेला आहे असे म्हणता येणार नाही. परिणामी, दिवाणी प्रक्रिया संहिता आज्ञावली ३९ नियम ११ नुसार त्यांचा बचाव रद्द होणेस पात्र नाही असे मला वाटते. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे:

**आदेश**

१. अर्ज फेटाळण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : कोरेगाव
दिनांक : ११/१०/२०२२

( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.